**वार्ता टिपण दिनांक १८/०६/२०१९**

**गावठी हातभटटी दारुचा साठा करणा-यांवर खंडणी विरोधी पथकाकडून कारवाई.**

दिनांक १८/०६/२०१९ रोजी खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र मोहिते हे त्यांचेकडील अधिकारी व कर्मचा-यांसह बिबवेवाडी, मार्केटयार्ड परिसरात अंमली पदार्थाचे गैरव्यवहाराचे अनुषंगाने माहिती काढणे व कारवाई करीता पेट्रोलिंग करीत असताना, आई माता मंदिराजवळ बिबवेवाडी पुणे येथे आले असता, विश्वासू बातमीदाराकडून बातमी मिळाली की, शेळके वस्ती बिबवेवाडी पुणे येथे महिला नामे कन्या अभिमन्यू राठोड व इतर महिला यांनी गावठी हातभटटी दारुचा मोठया प्रमाणात साठा केला आहे. अशी बातमी मिळाल्याने पो.नि.श्री राजेंद्र मोहिते यांनी त्यांच्या पथकाने वर नमूद ठिकाणी दोन पंचांचे उपस्थितीत छापा टाकला. तेथे महिला नामे १) कन्या अभिमन्यू राठोड वय-३५ वर्ष रा.शेळकेवस्ती, फाशी चौकाजवळ, बिबवेवाडी पुणे, २) विधेता अमन नानावत वय-२४ वर्ष रा.सदर व ३) संगिता अविनाश नानावत वय-२५ वर्ष रा.सदर या तीन महिला यांनी प्रत्येकी ४० लिटर हातभटटी दारुचे एकूण १४ कॅन त्यामध्ये एकूण दारु ५६० लिटर किं.रु.२८,०००/- चा प्रोव्हिबिशन माल जवळ बाळगला असताना मिळून आल्या. म्हणून वर नमूद तीन महिलांविरुध्द बिबवेवाडी पोलीस स्टेशन येथे महाराष्ट्र प्रोव्हिबिशन ॲक्ट कलम ६५(फ) प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

**सदरची कामगिरी ही गुन्हे शाखेचे अपर पोलीस आयुक्त मा.श्री.अशोक मोराळे सो., पोलीस उप आयुक्त श्री.शिरीष सरदेशपांडे सो.,सहा.पोलीस आयुक्त श्री.समीर शेख सो.यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राजेंद्र मोहिते, पोलीस उप निरी.आनंद रावडे, निखिल पवार, पोलीस कर्मचारी पांडुरंग वांजळे, प्रमोद मगर, महेश कदम, प्रकाश मगर, मंगेश पवार, अमोल पिलाणे, प्रविण पडवळ, नारायण बनकर व महिला पोलीस कर्मचारी मिना पिंजण, हेमा ढेबे यांनी केली आहे.**